पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.
कृ.प्रशासन/११/कावि/७५५/२०१४
दिनांक –२४/१०/२०१४

**विषय :- शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत महापालिका आस्थापनेवर शिकाऊ उमेदवारांची नेमणूक करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानरपालिकेच्या आस्थापनेवर शिकाउ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत सन २०१४-१५ व सन २०१५-१६ चे सत्रापरीता खालिल उमेदवारांना त्यांचे नांवासमोर नमूद केलेल्या व्यवसायाच्या पदावर प्रशिक्षण कालावधीसाठी व विद्यावेतनावर शिकाऊ उमेदवार म्हणून नेमणूक देण्यत येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव व पत्ता सर्व श्री व श्रीमती | ट्रेड/व्यवसाय | प्रशिक्षण कालावधी | विद्यावेतन दरमहा र.रू. |
|---|---|---|---|---|
| १. | सुदर्शन पंडीत शिंदे<br>संजय गांधीनगर बोराटे वस्ती मोशी-५ | इलेक्ट्रिशियन | १ वर्ष | २८००/- |
| २. | अमोल नवनाथ दराडे<br>गंधर्वनगरी मोशी पुणे-५. | इलेक्ट्रिशियन | १ वर्ष | २८००/- |
| ३. | गणेश नवनाथ गव्हाणे<br>बि.नं.१, रू.नं.९९,अजंठानगर चिंचवड पुणे-१९. | इलेक्ट्रिशियन | १ वर्ष | २८००/- |
| ४. | पाटेवार हरीहर तुळशीराम<br>कोकरे मेडप जवळ,विध्यानगर,चिंचवड पुणे-१९. | इलेक्ट्रिशियन | १ वर्ष | २८००/- |
| ५. | मारूती मोहन खेंगरे<br>ए/पी किवळे, ता.हवेली,पुणे. | इलेक्ट्रिशियन | १ वर्ष | २८००/- |
| ६. | अस्लम युनूस शेख<br>प्रज्ञा विकास हौ.सो.ए ४ घर क्र.३०७, अण्णासो.स्टेडीयम विठ्ठलनगर पिंपरी १८. | इलेक्ट्रिशियन | १ वर्ष | २८००/- |
| ७. | मंदार मोहन हरकरे<br>गावडे भोईर आळी, गावडेवाडा,चिंचवड पुणे-३३. | इलेक्ट्रिशियन | १ वर्ष | २८००/- |
| ८ | अजितकुमार इश्वरचंद कांबळे<br>सिध्दार्थनगर दापोडी पुणे-१२. | मॅ.क.ऑ.सी.वा.ऑ. | १ वर्ष | २८००/- |
| ९ | आकाश तानाजी माने<br>आकाशनिवास,अंधशाळेच्या मागे,भोसरी,पुणे-३९. | मॅ.क.ऑ.सी.वा.ऑ. | १ वर्ष | २८००/- |
| १० | गौतम चक्रपाणी भालेराव<br>म्हाळुंगे,कपीलनगर,दत्तमंदीराजवळ, मुळशी पुणे-४५. | मॅ.क.ऑ.सी.वा.ऑ. | १ वर्ष | २८००/- |
| ११ | उर्मिला कैलाश कांबळे<br>गवळीवाडा खडकी पुणे-३. | मॅ.क.ऑ.सी.वा.ऑ. | १ वर्ष | २८००/- |
| १२ | गणेश नंदकुमार कांबळे<br>१४ बी लाईन शास्त्रीनगर नगररोड,येरवडा पुणे-६. | मॅ.क.ऑ.सी.वा.ऑ. | १ वर्ष | २८००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | पोलाखरे विजय देविदास<br>मुक्ताईनगर,संताजीनगर,तहसीलरोड. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | २४००/- |
| १४. | मोरे पवन भागवत.<br>वरणगांव, नाथशाळेजवळ भुसावळ जळगांव. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | २४००/- |
| १५ | चौधरी निलेश प्रविण<br>पिप्री खुर्द, धरणगांव, जळगांव-४२५१०४. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | २४००/- |
| १६ | सुवेंद्र अशोक भुस्कट<br>विनायकनगर सुयोग कॉ.ग.क्र.२.<br>नवी सांगवी जि.पुणे. | प्लंबर | २ वर्ष | प्र. वर्ष- २४००/-<br>द्वि.वर्ष -२८००/- |
| १७ | धरमसिंग प्रतापसिंग पाटील<br>दहीगांव पाचोरा, जळगांव. | प्लंबर | २ वर्ष | प्र. वर्ष- २४००/-<br>द्वि.वर्ष -२८००/- |
| १८ | आकाश अनिल चव्हाण<br>से.नं.२१ स्किम.नं.५ रू.२०/१०<br>यमुनानगर निगडी पुणे-४४. | प्लंबर | २ वर्ष | प्र. वर्ष- २४००/-<br>द्वि.वर्ष -२८००/- |
| १९ | अंकुश संजय सुसर<br>शिरपुर ,बुलढाणा. | प्लंबर | २ वर्ष | प्र. वर्ष- २४००/-<br>द्वि.वर्ष -२८००/- |
| २० | सतिश भास्कर भोसले<br>रायपुर, बुलढाणा – ४४३००१. | प्लंबर | २ वर्ष | प्र. वर्ष- २४००/-<br>द्वि.वर्ष -२८००/- |
| २१ | अक्षय बळीराम सुसर<br>शिरपुर बुलढाणा. | प्लंबर | २ वर्ष | प्र. वर्ष- २४००/-<br>द्वि.वर्ष -२८००/- |
| २२ | दिपक प्रकाश परदेशी.<br>बोहटार पाचोरा जळगांव | प्लंबर | २ वर्ष | प्र. वर्ष- २४००/-<br>द्वि.वर्ष -२८००/- |
| २३ | प्रशांत दत्तात्रय जामदार<br>निघोजे खेड, पुणे ४१०५०१. | प्लंबर | २ वर्ष | प्र. वर्ष- २४००/-<br>द्वि.वर्ष -२८००/- |
| २४ | सत्यपाल रमेश गायकवाड<br>वरवंट खंडेराव संग्रामपुर बुलढाणा-४४४२०१. | प्लंबर | २ वर्ष | प्र. वर्ष- २४००/-<br>द्वि.वर्ष -२८००/- |
| २५ | विशाल फकीरबा थोंबाळे<br>शिरपूर बुलढाणा. | प्लंबर | २ वर्ष | प्र. वर्ष- २४००/-<br>द्वि.वर्ष -२८००/- |

**वरील शिकाऊ उमेदवारांवर प्रशिक्षण कालावधीमध्ये खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.**

१) वरील उमेदवारांना नि:संदिग्धपणे समज देण्यात येते की, त्यांची या आदेशान्वये करणेत आलेली नेमणूक ही पूर्णत: प्रशिक्षणार्थी म्हणून करण्यात आलेली आहे. प्रशिक्षणाचा विहित कालावधी पुर्ण होताच प्रशिक्षणार्थी म्हणून करण्यात आलेली ही नेमणूक आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे या उमेदवारांना महानगरपालिका आस्थापनेवरील कोणत्याही पदावर हक्क सांगता येणार नाही. अथवा हक्क राहणार नाही.

२) सदरच्या नेमणूका या उमेदवारांनी दिलेल्या शैक्षणिक अर्हता व तांत्रिक पात्रता जातीविषयाच्या दाखल्याच्या सत्य प्रती पाहून दिलेल्या आहेत. त्यामध्ये व मुळ दाखल्यामध्ये काही तफावत आढळल्यास किंवा नियम व अटीमध्ये बसत नसल्यास प्रशिक्षणार्थी म्हणून केलेली नेमणूक रद्द करण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

३) नेमणूकीच्या पदावर रुजू होताना उमेदवाराची शैक्षणिक पात्रता व अर्हता जातीविषयक व शाळा सोडल्याचा दाखला याची मुळ प्रत व त्यांच्या प्रत्येकी दोन प्रमाणे सत्य प्रती आणाव्यात. त्याशिवाय रुजू करून घेतले जाणार नाही.

४) प्रशिक्षणार्थी रूजू होताना नव्याने काढलेल्या आपल्या छायाचित्राच्या पाच कॉपीज सोबत आणाव्यात. व त्यापैकी दोन फोटो दोन स्वतंत्र कागदावर चिटकवून त्या फोटोवर ओळखणारे अधिकारी/पदाधिकारी यांची स्वाक्षरी घेऊन सादर करावेत. त्याशिवाय रुजू करून घेतले जाणार नाही.

५) नेमणूक दिलेल्या उमेदवारांनी **दिनांक १५/१०/२०१४ पुर्वी** महानगरपालिकेच्या प्रशासन विभागात रुजू व्हावे. या मुदतीत रुजू न झाल्यास कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार न करता नेमणूक रद्द झाली आहे असे समजण्यात यावे. तसेच औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मोरवाडी व कासारवाडी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त झालेले गुण व जात इ.तपशिल विचारात घेऊन नेमणूका दिल्या आहेत. त्या माहितीमध्ये तफावत असल्यास व प्रत्यक्षात जातीचा दाखला नसल्यास शिकाऊ उमेदवारास रूजू करून घेतले जाणार नाही. अशा उमेदवारांची नेमणूक आपोआप संपुष्टात यावी असे समजण्यात येईल.

६) नेमणूक दिलेल्यश शिकाऊ उमेदवारास नेमून दिलेल्या प्रशिक्षण कालावधी पुर्ण करावा लागेल व शिकाऊ उमेदवार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित नमूना शेड्यूल-३ मध्ये (नियम क्र.१४) करारनामा करून द्यावा लागेल. सदर करारनाम्याचा फॉर्म हाऊस ऑफ फॉमर्स संन्डविक कंपनीसमोर, कासारवाडी किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्था बी.टी.आर.आय, विभाग, औंध पुणे-७ येथून उमेदवाराने स्वतः आणून त्याच्या तीन स्वतंत्र प्रती टंकलिखित करून विहित नमून्यातील फॉर्ममधील जागेवर साक्षीदारांच्या स्वाक्षरी घेऊन सादर करणे बंधनकारक राहिल. खाडाखोड केलेले अथवा अपुर्ण माहिती भरलेले फॉर्म स्विकारले जाणार नाही.

७) उमेदवार प्रशिक्षण कालावधीत विनापरवाना गैरहजर राहिल्यास किंवा गैरवर्तणुक आढळल्यास त्यास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना अगर नोटिस न देता केव्हीही प्रशिक्षणार्थी पदावरून कमी केले जाईल व प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही फायदा दिला जाणर नाही.

८) प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवारांना नमुद केल्याप्रमाणे विद्यावेतन व शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६२ मधील नियम पोटकलम (अ) १ नुसार वर्षात १२ दिवस किरकोळ रजा, नियम ९(ब) १ नुसार १५ दिवस वैद्यकीय रजा फक्त अनुज्ञेय राहतील. या व्यतिरिक्त अन्य कायदे अथवा सवलती अनुज्ञेय राहणार नाहीत. तसेच दर तीन महिन्यानंतर वेगवेगळया विभागामध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून काम करावे लागेल. याची सर्व संबंधित शिकाऊ उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९) प्रशिक्षण कामकाजाची वेळ ऑफीस स्टाफचे कार्यालयीन कामाचे वेळेनुसार राहिल व सर्व शासकीय सुट्टया देय राहतील. शिकाऊ उमेदवारांना शिफ्ट ड्यूटीमध्ये व अन्य पदाचे कामकाज देय राहणार नाही.

१०) शिकाऊ उमेदवारांची संविदा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध येथे कोणत्याही कारणास्तव नोंदणी न झाल्यास सदरच्या उमेदवारांस त्वरीत कार्यमुक्त करण्यात येईल व कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

११) शिकाऊ उमेदवारांचे व्यावसायिक परिक्षेकामी आवश्यक असणारे सर्व कागदपत्रांची पुर्तता संबंधित उमेदवाराने स्वतः बी.टी.आर.आय. विभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध, पुणे यांचेकडे संपर्क साधुन विभाग प्रमुखांमार्फत विहित मुदतीत करावी.

१२) शिकाऊ उमेदवारांनी प्रशासन विभागात रूजू होतेवेळी आय.टी.आय. कडील गुणपत्रिकेची मुळ प्रत जमा करावी लागेल. त्याशिवाय रुजू करून घेतले जाणार नाही. **सदरची मूळ प्रत दिनांक १६/११/२०१४ ते दि.३०/११/२०१४** या कालावधीत प्रशासन विभागात स्वतः येऊन स्वाक्षरी पोहोच देऊन परत घेऊन जावीत. सदर मुदतीत मूळ कागदपत्रे न नेल्यास त्यास प्रशासन विभाग जबाबदार राहणार नाही.

**१३) प्रथम व द्वितीय निर्गत करणेत** आलेल्या आदेशातील **उमेदवार रुजू न झाल्यास रिक्त जागेवर, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मोरवाडी येथे** कोर्स पूर्ण झालेल्या व जाहिरात प्रसिद्धीतील प्राप्त अर्जामधील पात्र **उमेदवारांना नेमणूकीचे आदेश देणेत** येत आहे. या यादीतील जे उमेदवार **प्रथम प्रशासन विभागात** हजर

होऊन रुजू होतील, त्यांनाच प्रथम प्राधान्याने रिक्त जागेवर नेमणूक देणेत येईल. रिक्त जागा भरल्यानंतर विलंबाने येणा-या उमेदवारांना रुजू करुन घेतले जाणार नाही व त्यांची कोणतही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची स्पष्ट नोंद घ्यावी.

सही/-
सहा.आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रति,

सर्व संबंधित शिकाऊ उमेदवार

प्रत – १)लेखा विभाग २)मुलेप विभाग ३)संबंधित विभाग

२/- शिकाऊ उमेदवारांना आपले नियंत्रणाखालील विविध विभागांमध्ये दर तीन महिन्यांनंतर वेगवेगळ्या विभागामध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून सविस्तर नेमणमक करावी. त्याबाबतचा अहवाल सादर करावा. तसेच सदरच्या उमेदवारांना दरमहा १० तारखे पुर्वी विद्यावेतन संबंधित विभागप्रमुखांनी अदा करावे आणि त्यांची मासिक हजेरी विचारात घेऊन उमेदवार गैरहजर राहिल्यावर आपले अधिकारामध्ये त्यांचेविरुद्ध कारवाई करावी. तसेच शिकाऊ उमेदवारांना त्यांचे व्यवसायाचे सखोल प्रशिक्षण देणेकामी संबंधितांना सूचना द्याव्यात. उमेदवारांचे व्यावसायिक परिक्षेकामी आवश्यक असणारे सर्व कागदपत्रांची पुर्तता संबंधित उमेदवाराने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध यांचेकडे संपर्क साधून विहित मुदतीत करणेकामी आपलेमार्फत फॉर्म सही करून द्यावेत.

४) मा.सहा.प्रशिक्षणार्थी सल्लगार (वरिष्ठ) मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध, पुणे ७

५) मा.रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र ४८१, रास्तापेठ पुणे ४११ ०११.

६) मा.रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, रेल्वे उड्डाण पुलाशेजारी, पिंपरी, पुणे ४११ ०१७.

७) मा.प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मोरवाडी, पिंपरी १८.

१४.१०.१४
प्रशासन अधिकारी, तपासणी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.